## जाहिरात दिनांक :

## (One Stop Crisis केंद्र कंत्राटी/मानधन पद भरती)

जिल्हा महिला बाल विकास कार्यालय अकोला अंतर्गत (**One Stop Crisis**) केंद्र सरकार पुरस्कृत योजनेच्या दैनंदिन कामकाजाकरिता अधिक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय तथा इम्प्लेमेंटिंग एजन्सी अकोला मार्फत कंत्राटी तत्वावर निवड करण्यासाठी अहर्ता व अनुभव पात्र असलेल्या इच्छूक उमेदवाराकडून आवेदन अर्ज **dhw_akola@rediffmail.com** किंवा **www.dhwakola.in**या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहे.सविस्तर जाहिरात संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज करण्याची शेवटची तारीख : २१ मार्च २०२१ सायंकाळी ५:०० पर्यंत**

| क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अहर्ता | अनुभव | एकत्रित मासिक मानधन | विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्र प्रशासक/व्यवस्थापक **(पद १ महिलांकरिता राखीव )** CenterManagement **वय – किमान २५ ते कमाल ४५ (अंशकालीन कर्मचारीकरिता कमाल 55 वर्षे )** | कायद्याची पदवी (LLB)/समाज कार्य विषयात पदव्युत्तर (MSW) धारण केलेले उमेदवार | कमीत कमी ५ वर्ष शासकीय / निमशासकीय प्रकल्पात महिलांच्या हिंसाचाराविरुद्ध (VAW) या क्षेत्रात कामाचा अनुभव व १ वर्षाचा अतिरिक्त / समाविष्ट महिला समुपदेशन हाताळण्याचा अनुभव असावा. | २५०००/- | सदर पदाकरिता स्थानिक महिलांचा विचार केला जाईल. तसेच आहर्ताप्राप्त अनाथ व पदवीधर अंशकालीन कर्मचारी (जिल्हा कौशल्य स्वयंरोजगार विभाग नोंद असलेले उपलब्ध झाल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल ) |
| २ | केस वर्कर (पद संख्या १) **वय – किमान २५ ते कमाल ४५ (अंशकालीन कर्मचारीकरिता कमाल 55 वर्षे )** | कायद्याची पदवी (LLB)/समाज कार्य विषयात पदव्युत्तर (MSW) धारण केलेले उमेदवार | कमीत कमी ३ वर्ष शासकीय / निमशासकीय प्रकल्पात महिलांच्या हिंसाचाराविरुद्ध (VAW) या क्षेत्रात कामाचा अनुभव | १५०००/- | |
| ३ | मेडीकल अस्सीस्टंट (पद संख्या १) **वय – किमान २५ ते कमाल ४५ (अंशकालीन कर्मचारीकरिता कमाल 55 वर्षे )** | पॅरामेडीकल विषयात पदवी धारण केलेला कोणतीही महिला (आरोग्य विभागात तांत्रिक प्रशिक्षित / पार्श्वभूमी असलेला) | कमीत कमी ३ वर्ष शासकीय / निमशासकीय प्रकल्पात महिलांच्या हिंसाचाराविरुद्ध (VAW) या क्षेत्रात जिल्हा स्तरावरील आरोग्य प्रकल्प / कार्यक्रमाचा अनुभव | १८०००/- | |
| ४ | IT Activities माहिती तंत्रज्ञान कर्मचारी (पद संख्या १) **वय – किमान २५ ते कमाल ४५ (अंशकालीन कर्मचारीकरिता कमाल 55 वर्षे )** | संगणक / माहिती तंत्रज्ञान पदवीधर सोबत संगणक पदविका / माहिती तंत्रज्ञान | डेटा व्यवस्थापन, दस्तऐवज प्रक्रिया आणि दिलेल्या नमुन्याच्या आधारावर माहिती पुरविणे, दूरचित्रवाणी द्वारे परिषद (VC) बाबत राज्य / जिल्हा/ अशासकीय स्तरावर / माहिती तंत्रज्ञान आधारित संस्थेचा कमीत कमी ३ वर्षाचाकौशल्य अवगत असण्याचा अनुभव असावा. | १५०००/- | माहिती तंत्रज्ञान सेवा क्षेत्रातील बाह्यस्त्रोत्रातील कोणताही व्यक्ती अहर्ताप्राप्त अनाथ व पदवीधर अंशकालीन कर्मचारी (जिल्हा कौशल्य स्वयंरोजगार विभाग नोंद असलेले पात्र राहिल) |
| ५ | Multipurpose Activities बहुउद्देशीय कर्मचारी / मदतनीस/ शिपाई (पद संख्या १) **वय – किमान २५ ते कमाल ४५** | कोणताही शिक्षित (Literate) कमीत कमी १० वी उत्तीर्ण असावा. | कमीत कमी ३ वर्षाचा मदतनीस/ शिपाई वगैरे कामाचा अनुभव | ९०००/- | बहुउद्देशीय कर्मचारी बाह्यस्त्रोत्रातील कोणताही व्यक्ती तसेच अहर्ताप्राप्तअंशकालीन कर्मचारी / अनाथास प्राधान्य |

**१.**इच्छुक उमेदवारांनी दिनांक १७ मार्च २०२१ ते २१ मार्च २०२१ सुटीचे दिवस सोडून सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत कार्यालयात सोबत जोडलेल्या नमुन्यात (नमूद इमेल किंवा सांकेतिक स्थळ) अर्ज सादर करावा. त्यामध्ये खालील कागदपत्रे UPLOAD करावे.

अ) वयाचा पुरावा (जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

ब) शैक्षणिक अहर्ता दहावी उत्तीर्ण, पदवी/पदविका प्रमाणपत्र

क) अंतिम वर्षाची गुणपत्रिका (संबंधित पदासाठी अहर्ता प्राप्त)

ड)शासकीय अथवा निमशासकीय संस्थांमध्ये काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र (अनुभवाच्या कालावधीतील शेवटच्या ६ महिन्याचे मानधन पत्र अथवा पगार पत्र सोबत जोडावे), अनाथ (महिला बाल विकास विभाग प्रमाणित केलेले प्रमाणपत्र)अथवा अंशकालीन कर्मचारी असल्यास सक्षम अधिकाऱ्याकडून सादर केलेले प्रमाणपत्र जोडून साक्षांकित प्रतीसह अंमलबजावणी यंत्रणा (IA) म्हणून घोषित झालेले अधिक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला या कार्यालयाच्या **dhw_akola@rediffmail.com**किंवा

**www.dhwakola.in**या संकेत स्थळावर अर्ज दिनांक २१ मार्च २०२१ पर्यंत सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत सादर करावा.उशिरा आलेला अर्ज कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतल्या जाणार नाही.

- ✓ अर्ज प्राप्त झाल्यावर दिनांक २२ मार्च २०२१ रोजी छाननी प्रक्रिया करण्यात येईल.
- ✓ तात्पुरत्या स्वरुपाची यादी (Provisional List)दिनांक २५ मार्च २०२१रोजी अधीक्षिका जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला यांचे संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल.
- ✓ तात्पुरत्या यादीवर आक्षेप घेण्याचा दिनांक २६ मार्च २०२१ रोजी सायंकाळी ५:०० पर्यंत राहिल.
- ✓ प्राप्त झालेले आक्षेप समितीसमोर ठेवण्याचे दिनांक २९ मार्च २०२१
- ✓ आक्षेपाचे निवारण झाल्यावर अंतिम यादी दिनांक ३० मार्च २०२१ संकेत स्थळावर प्रकाशित करण्यात येईल. सोबत प्रतीक्षा यादी (WaitingList) सुद्धा लावण्यात येईल. ज्यामध्ये एका पदासाठी ५ उमेदवार यासह प्रतीक्षा यादीची कालमर्यादा ३१ मार्च २०२२ पर्यंत राहिल. अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर लगेच पात्र उमेदवारास नियुक्ती पत्र ज्ञात येईल.
- ✓ उमेदवारास नियुक्ती पत्र मिळाल्यापासून ७ दिवसाचे आत कार्यालयास रुजू व्हावे लागणार आहे. जे उमेदवार विहित कालावधीत रुजू होणार नाहीत त्यांची नियुक्ती रद्द समजण्यात येईल. अंतिम यादीनुसार पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

**२. निवड प्रक्रिया**– एका पदासाठी एकापेक्षा जास्त आवेदन प्राप्त झाल्यास पदवी/पदविका अंतिम वर्षाचे मिळालेले गुण (पद क्रमांक ५ बहुउद्देशीय कर्मचारी करिता अंतिम वर्ष १० वा वर्ग उत्तीर्ण असल्याची गुणपत्रिका गृहीत धरल्या जाईल.उच्च शैक्षणिक गुणाचा गणना समिती समोर निर्णय घेऊन केली जाणार याची नोंद घ्यावी.) + पदव्युत्तर व अतिरिक्त उच्च शैक्षणिक अहर्ता + शासकीय / निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबीचे गुण एकत्र करून सर्वात अधिक गुण आहेत अश्या उमेदवारांची निवड केल्या जाईल. अनाथ / पदवीधर अंशकालीन कर्मचारी अंशकालीन कर्मचारी यांचे करिता फक्त मूळ पात्रता व अनुभव विचारात घेऊन विचार केला जाईल. अनाथ अंशकालीन कर्मचारी जिल्हा कौशल्य विकास विभागाकडून नोंद असलेले अर्ज प्राप्त झाल्यास त्याची स्पर्धा त्यांचे आपसात होईल व इतर उमेदवारासोबत केली जाणार नाही.अनाथ, अंशकालीन कर्मचारी उपलब्ध झाल्यास इतरांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच जास्तीत जास्त अनुभव असलेले उमेदवाराच्या अनुभवाचे प्रमाणपत्र / अनाथ व अंशकालीन पडताळणी करिता जिल्हा व्यवस्थापन समिती यांच्या बैठकीत विचार विनिमय करून त्यावरील अंतिम निर्णय घेण्यासाठी समितीसमोर ठेवण्यात येईल, गुणदानाची अंतिम गुण पत्रिका (पदासाठी अहर्ता असलेली शैक्षणिक पात्रता)+ अतिरिक्त उच्च शैक्षणिक अहर्ता + अनुभव इत्यादी निकषाचा आधार किंवा टक्केवारी व्यवस्थापन समिती गुणवत्ता धारक (Merit) अनुसार ठरविण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**३.** वरील सर्व पदे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपाची व एकत्रित मानधनाच्या रकमेतून टीडिएस (TDS)/ PPF कपात केली जाईल. मानधन शासनाचे अनुदान उपलब्धेनुसार देण्यात येईल. तसेच सदर पदे ११ माहिन्याच्या तसेच सदर योजना प्रत्यक्ष कार्यरत असे पर्यंत कालावधीकरिता राहील, व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार उत्कृष्ट काम करणाऱ्या उमेदवारास मुदतवाढ देण्यात येईल. या सर्व बाबींसाठी उमेदवार व इम्प्लेमेंटिंग एजन्सी (IA) अथवा जिल्हा स्त्री रुग्णालय दोघांमध्ये महिला आयुक्तालय पुणे यांनी तयार केलेल्या नमुन्यातील करारपत्र नुसार करारपत्र करून द्यावे लागेल याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

**४.** महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई यांचा शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेंबर २०१९ व वन स्टॉप सेंटर योजनेचे मार्गदर्शन सूचनेतील तरतुदीनुसार तसेच जिल्हा महिला बालविकास अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या जबाबदारी व कर्तव्याचे (JobCard) पालन आपणास करावे लागेल याची नोंद उमेदवाराने घ्यावी.

**५.** वरील पदे ही केंद्र/राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम व अटी शर्ती याबाबत उमेदवाराचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाची सेवा नियम लागू नाही.

**६.**केंद्र व राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास तसेच कर्तव्यात कसूर केल्यास पूर्वसूचना न देता तात्काळ उमेदवाराची सेवा समाप्त करण्यात येईल.

**७.** अर्जदारास पोलिसांकडून चारित्र प्रमाणपत्र असल्यास अर्जासोबत जोडावे. अर्जासोबत उपलब्ध नसल्यास निवड झाल्यावर ३० दिवसाच्या आत द्यावे किंवा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता अर्ज केल्यास त्याची पोच पावती सादर करावी लागेल किंवा चारित्र प्रमाणपत्रात आक्षेपार्य बाबी असल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल तसेच रुजू झाल्यावर वैद्यकीय प्रमाणपत्र ३० दिवसांत सादर करावे लागणार याची नोंद घ्यावी.

**८.** कंत्राटी पदभरती प्रक्रिया रद्द करणे/बदल करणे/पदभरती बाबत आक्षेप/ अनाथ उमेदवाराच्या अनुभवाच्या बाबतीत अंतिम निर्णय घेणे इत्यादी अधिकार मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष व्यवस्थापन समिती अकोला यांचे राहिल.

**९.** एका उमेदवारास एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करता येणार नाही. चुकीचा इमेल, मोबाईल क्रमांक अर्जात नमूद करू नये. इमेल व मोबाईल क्रमांक बंद असल्यास कोणत्याही तांत्रिक कारणामुळे संवाद (Communication)न झाल्यास Implementing Agency जबाबदार

राहणार नाही. उमेदवारास काही अडचण असल्यास Telpone क्रमांक ०७२४-२४१०५०८, ०७२४-२४११७७८, मोबाईल क्रमांक ९८३४५२०२९५, ८२७५४१७९०० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**स्वा**
**सदस्य सचिव व्यवस्थापन समिती**
**तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अकोला**
**अकोला**

**स्वा**
**इम्प्लेमेंटीग एजन्सी तथा अधीक्षिका**
**जिल्हा स्त्री रुग्णालय**

३.५ * ४.५ Size
नुकताच काढलेला
फोटोवर स्वाक्षरी
करून लावावा

## अर्जाचा नमुना

प्रति,
मा. अधीक्षिका, जिल्हा स्त्री रुग्णालय,तथा इम्प्लेमेंटिंग एजन्सी (OSC) अकोला
पदाचे नाव :- ...........................................................................................................................................

१) उमेदवाराचे नाव :- ........................................................................................लिंग : पुरुष / महिला
२) उमेदवाराच्या वडिलाचे संपूर्ण नाव :- ........................................................................................................
३) जन्म तारीख :- ( / / ) वय :- वर्ष .......... महिना ............. दिवस ......................
(जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिवशी)
४) राहण्याचा पत्ता :- ........................................................................................................................
...........................................................................................................................
.................................................................पिन कोड :...........................................
५) मोबाईल नंबर (**अनिवार्य- शक्यतो Whatsapp No. द्यावा**) :- ......................................................
६) इमेल : ...........................................................................
७) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- ................................................
८) अर्जदार अनाथ आहे किंवा नाही :- ...................................................

९) अर्जदार पदवीधर अंशकालीन कर्मचारी आहे किंवा नाही :- .....................

१०) शैक्षणिक पात्रता :-

| अ. क्र. | धारण केलेली अर्हतेचा तपशील | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | फक्त संबंधित पदाकरिता शै. अर्हता अंतिम वर्षाचे मिळालेले गुण | अंतिम वर्षाची टक्केवारी नमूद करावी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

११) अनुभव :-

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

१२) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रति Upload कराव्यात (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमूद करावा)

१)............................................ २).............................................. ३)...........................................

४)........................................... ५).............................................. ६)............................................

७)........................................... ८)............................................... ९)............................................

१३) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. या पदासाठी ................................ विहित केलेली शैक्षणिक पात्रता मी धारण करीत आहे. याची खात्री करून हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते कि वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कार्यवाहीस मी पात्र राहिल व मा. व्यवस्थापन समितीने तसेच Implementing Agency ने घेतलेला निर्णय मला मान्य राहिल. त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

**दिनांक :-**

**स्थळ :-स्वाक्षरी**

**(टिप :- उपरोक्त पदांसाठी अर्ज करताना सर्व कागदपत्रे PDFFormat मध्ये विहित मुदतीत dhw_akola@rediffmail.comकिंवा www.dhwakola.inया संकेत स्थळावर पाठवावे. अंतिम दिनांकाच्या सायंकाळी ५:०० नंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य धरल्या जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.)**